# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक १२ | मुंबई | जुलै, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## सजल श्याम घन

**—सुहासिनी कीर्तिकर**

मे महिन्याची सुट्टी संपली की पावसाळा आणि शाळा एकदमच सुरू व्हायची पूर्वी ७ जूनला. सात जूनला मुलं शाळेत हजर; तसा पाऊसही शहाण्या मुलासारखं आपलं वेळापत्रक पाळायचा. पैसा खोटा होओ; न होओ... तो आपला 'मोठ्ठा' पडायचाच. या पावसाशी सगळ्याच मुलांची गट्टी. म्हणून मग त्यालाच सोबतीला घेऊन 'शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल का?' असे नंदिबैलाला विचारायचे. आनंदाने 'पावसात भिजू, नाचू' म्हणायचे. माझ्या मुली त्यांच्या लहानपणी मुद्दाम माझी फिरकी घेत हाक मारायच्या, 'एऽऽआई!' मी 'ओ' म्हटलं की हसत हसत रेकॉर्डमधली पुढची ओळ म्हणायच्या, 'पावसात जाऽऽऊ का?' पावसात भिजल्याने मनाला आनंदाची आंघोळ होते ना! 'रस्त्याने ओघळ, जाती खळखळ, सोसाट्याने वारा वाहे, तुडुंबले जळ'... सारख्या ओळी अशावेळी समृद्धीचे रेखाटन करतात. म्हणूनच मुलं अन् कवीमन कधीही पावसाला 'रेन, रेन गो अवे' नाही म्हणत. आपले विंदा (करंदीकर) - 'येरे येरे पावसा, तुला देतो पैसा' ही जुनीच ओळ घेऊन नवीन बंध निर्माण करतात. ते पुढं म्हणतात, 'पैशाचा घे खाऊ, दूर नको जाऊ...' शांताबाई शेळकेही पावसाला 'दूर नको जाऊ' म्हणत त्याला भेटण्याची असोशी व्यक्त करतात. - 'येरे येरे पावसा नको दूर राहू, कवळाया तुला पसरले बाहू' कारण पाऊस म्हणजे निसर्गचक्राची वेडावून टाकणारी किमयाच. 'रान झाले हिरवेगार' ही प्रचिती पावसात धुंद झाल्यावरच येते ना! अटळपणे आठवतात त्या नलेश पाटील यांच्या ओळी -

'घन आभाळीचा तडकावा, मातीस मिळावा शिडकावा झाडांवरती पुन्हा नव्याने, रंग हिरवा फडकावा....' नलेश पाटील या ओळी गायचे तेव्हा हिरव्या रंगाचे सृजनाचे निशाण झाडांनी फडकते ठेवल्यासारखेच वाटायचे. याच पावसाने डोंगरावरून झरा बनून जीव धरला की नलेशना वाटायचे, डोंगरांनी जानवेच घातले आहे. 'ऐलतटावर, पैल तटावर हिरवाळी घेऊन झरा वाहतो बेटाबेटातून' असे बालकवींनीही 'निर्झरगीत' ऐकले होते ना!

नलेश पाटील यांची कविता तर जीवंत निसर्ग चित्रणच.

'माड घुसले वाऱ्यात नभ ओतले झऱ्यात

गुंतले रे मन माझे पावसाच्या दोऱ्यात' असं त्यांचं मन पावसाचंच होत जायचं. ही काही एकट्या नलेशचीच अवस्था नाही. शांताबाईही (शेळके) थोड्या चक्रावूनच विचारतात, 'इतक्या पावसाळ्यानं शिकवलेलं शहाणपण.

पावसाच्या एका सरीनंतर कुठे वाहून जातं?'

आयुष्याचे कितीही पावसाळे पाहिले, भरले तरी आपल्या वाढत्या वयाबरोबर, मनाच्या वाढत्या / बदलत्या अवस्थेबरोबर पाऊसही आपलं नातं जोडून असतो. म्हणूनच धुंद पावसात सचैल (वस्त्रांसहित) भिजताना बेधुंद होऊन बा.भ.बोरकर उत्स्फूर्तपणे गातच सुटले - सरीवर सरी आल्या गं.

सचैल गोपी न्हाल्या गं.' मग त्या गीतात एक आवर्तच तयार होत रहातं. अन् 'सरीवर सरी, सरीवर सरी..' कोसळतच रहातात. पुन्हा नलेशच आठवतात इथे सहज! आकाश ओथंबून आल्याचं ते कसं सांगतात - 'निळेभोर गर्दमोर नभ तुडुंब साचते.'

'रान हिरव्या सुखाने चिंब होऊन नाचते.' 'ही हिरव्या सुखाने चिंब' होण्याची अवस्था जशी कवीमनाची; तशीच शेतकरी मनाचीही. शेतकरी मन म्हटलं की आठवल्याच पाहिजेत आपल्या बहिणाबाई (चौधरी). त्यांची 'आला पाऊस' ही कविता संपूर्णच एक देखणे चित्र. ते इथे देण्याचा मोह आवरतच नाहीये. **आला पाऊस -** बहिणाबाई चौधरी.

आला पह्यला पाऊस
शिपडली भुई सारी
धरित्रीचा परिमय
माझं मन गेलं भरी
आला पाऊस पाऊस
आता सरीवर सरी
होतं शिवारं भिजले
नदी नाले गेले भरी
आला पाऊस पाऊस
आता धूमधडाक्यानं
घर लागले गयालं
खारी गेली बाहीसनं
आला पाऊस पाऊस
आली ललकारी ठोकत
पोरं निघाले भिजत
दारी चिल्लाचा भारत
आला पाऊस पाऊस
गडगडाट करत
धडधड करे छाती
पोरं दडाले घरात
आला उगू दे रे शेतं
आला पाऊस पाऊस
व्हये येऊ देरे रोपं
आता फिटली हाऊस
येता पाऊस पाऊस
पावसाची लागे झडा
आता खा रे वडे भजे
घरामंदी बसा दडी
देवा पाऊस पाऊस
तुझ्या डोयातले आंस
दैवा तुझा रे हारास
जीवा, तुझी रे मिरास

बहिणाबाईंचा कवितेतील 'पाऊस' असा कोसळला की इतर कवयित्रींच्या कवितेतील 'पाऊस' ही आपल्या मनात कोसळू लागतो. कारण तो नुसता पाऊस नसतोच मुळी. पावसाच्या भावस्थितीत एकाकार झालेले स्त्रीमन असते तिथे. म्हणून मग 'अनिलां'च्या पावसाला प्रियकराचे येणे बिलगते तसेच त्याला बिलगून, चिंब होऊन गेलेले स्त्रीमनही कवयित्रींना लोभावते. असे निसर्गाचे चैतन्यरूप भोगणाऱ्या 'इंदिरा'बाईंच्या कविता तर किती किती सांगाव्यात. 'मीच होतसे इंद्रधनू अन् तुझ्या जीवाच्या आकाशावर अशी सुरंगा राहते रेलून' अशी अवस्था भोगणारी त्यांच्या कवितेतील स्त्री 'थेंब धारेचा होऊन' पावसात सामावूनच जाते की.

मेघ:श्याम पालाणाते
झाकोळला अवकाश
रेषा वाऱ्याची हलेना
झिम्मा धरला पाऊस
संथ पावसाचे झोत
पान पाऊस वरून
झाडावरती पाखरू
घट्ट फांदीला धरून
निथळते ओले पंख
डोळे घेतले मिटून
कसे सामावून गेले

थेंब धारेचा होऊन... हे असं 'थेंब धारेचा होऊन' जाणं सोप्पं नसतंच... कृ. ब. निकुंब यांना त्यातला 'आशय' कळला. तो कळावा लागतो ना! 'इथून तिथे - तिथून इथे - क्षितिजापर्यंत पाणीच पाणी.

पाण्याच्या क्षितिजात मिसळलेले!.... परिपूर्ण आशय.'

हा 'आशय' उलगडतो तेव्हा कवयित्री पद्मा म्हणतात त्याप्रमाणे 'घन:श्याम आषाढाचा' भोगायला 'तुझ्या साक्षात्कारासाठी संगतीची ना गरज!' हे सत्यही उलगडते. फक्त पाऊसच तेथे पुरेसा असतो.

पाऊस असा 'प्रियसखा घन:श्याम' झाला की मनाला कितीतरी हिरवे कोंब फुटतात. जंत्री तरी किती किती अन् कशी द्यावी? खरं तर पाऊस आला की अशा पावसाच्या कविता मनात जागवत पाऊसमय होत जाणे हाच मुक्तीचा मार्ग. मग ते रामदास स्वामींचे 'धबाबा आदळे तोय' असो वा नलेशनं रेखाटलेलं सुंदर भावचित्र असो अथवा 'सजल श्याम घन गरजत आले बरसत आज तुषार आता जीवनमय संसार' या कुसुमाग्रजांच्या ओळी असोत. किंवा भावचित्र फार देखणं अन् अलिप्तपणं रेखाटणारी शंकर वैद्यांची कविता

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)

असो. मन चिंब चिंब करणारी ती अवस्था आपण भोगतच रहातो. शंकर वैद्य यांच्या कवितांच्या ओळी आठवल्यात; अन् त्या इथं द्यायच्याच नाहीत? कसं शक्य आहे हे?

तेव्हा 'श्रावणसरी' नावाची जुन्या अनुबंधाशी नातं सांगणारी त्यांची चित्रमय कविता इथं यायलाच हवी.

**'श्रावणसरी'**

मेघ सावळा फुलारूनिया विरघळता अंबरी
कलत्या रविचे ऊन विंचरित आल्या श्रावणसरी
तुषार चुंबुन किरण कोवळे कलती पूर्वेकडे
वसुंधरेला इंद्रधनुचे स्वप्न गुलाबी पडे
खुळा होऊनी मेघ डवरूनी नाचे मोरापरी
गिरक्या घेऊन मंद उतरती या सोनेरी सरी
सर्रास फुटते हास्य उन्हाचे ऊन पाझरे उरी
अनुरक्तीची मिठी रेशमी कायापालट करी
नभी अजूनही मेघ उपणितो तुषार मोत्यांपरी
अजुन लावतो रवि क्षितिजांना सोनेरी झालरी
निळ्या घनातून घननीळाचे भास किती पांगळे
पूर्ववरती म्हणून सुदर्शन अजुनी खोळंबले
विस्मित होऊन हासून बघते ही आलेती धरा
भिजून सुकते खुलून भिजते सुकते भिजते जरा
सघन सुखाची ओढ अनावर दाटे तिचिया उरी
ऊन-सरींतून घार भरारे दिगंत मेघोदरी!

आपणही ही कविता वाचताना भिजून सुकतो - सुकून भिजतो अन् घार बनतो. पुन्हा भुईवर उतरतो. असा पाऊस अनेक परींनी बरसत रहातो.

भले मग अशा पावसाने मुंबापुरीची पुरी दैना केली अन् ती संकटे घेऊन 'अंगे भिजली जलधारांनी' अशी होऊन सैराट झाली तरीही. हासुद्धा शहरी पाऊसच.

सध्या विविध परीक्षांचे निकाल लागताहेत. विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद आपल्या मनाला चिंबचिंब करतो आहे. आपलं मन भरून येऊन आशीर्वादांची बरसात करीत आहे. असाही असतो पाऊस! हो ना?

✳

**उद्यम्**

# CASHEW PROCESSING- The King of Dry Fruits

**-सुदेश प्रबोध देसाई**

The demand for cashew nut is gradually increasing, whereas its supply is limited. India is the largest producer, processor, consumer and exporter of cashew nuts in the world. As it is impossible to consume raw cashew and cashew apple, thus, both of them need processing before consumption. Cashew nuts, which is one the famous dry fruits, involves processing of raw cashews. Cashew Nuts can either consumed directly or converted to a variety of products like salted cashew nuts, Kaju Burfi, cashew curries etc

**Land and Land Development**

- ✶ 500 sqm land will be sufficient for small-scale cashew processing unit.
- ✶ Levelling of the site must ensure adequate space for sun drying of raw cashew.
- ✶ The land should be free from any encumbrance and shall be mortgage able and classified as non-agriculture.
- ✶ Leased land can also be taken but the lease period should be sufficiently more than the repayment period of the loan. The leased land should preferably be with an enabling clause for a mortgage of land to banks or financial institutions.
- ✶ The cost of land and land development varies from place to place. Land cost of Rs. 3 lakh and land development cost of Rs. 0.30 lakh is optimum for 500sqm model.

**Buildings and Civil Works**

- ✶ The cashew processing unit requires a processing, drying, and packing area.
- ✶ A built-up area of 250 sqm is adequate for a cashew processing unit of small scale. Main processing area would require about 55-60 sqm, whereas storage and packing rooms would occupy balance area.
- ✶ The terrace can work as drying yard for raw cashew.
- ✶ The total estimated cost of the building is Rs.50.00 lakh.
- ✶ The construction of buildings for processing of cashew as per the guidelines of FSSAI.
- ✶ The height of the building should be such that sufficient breathing space is available. All windows and doors should be provided with insect proof wire mess. Slope as per standard guidelines should be provided on the floor.
- ✶ Glazed tile flooring shall be preferable to ensure easy cleaning of the floor after processing session.

**Plant & Machinery**

- ✶ Cashew processing is a seasonal activity and the factory would work for about 200 days in a year.
- ✶ Keeping in mind the availability of raw materials and market prospects, the processing capacity of 500 tons of raw cashew processing per season is optimum.
- ✶ The estimated cost of plant and machinery is Rs.60.15 lakh. The details of plant and machinery and other equipment are given in Table as shown below.

| Sr | Particulars | Qty. | Rate | Amount (Rupees) |
|---|---|---|---|---|
| 1 | Steam Boiler | 1 | 7,58,000 | 7,58,000 |
| 2 | Cooking Vessels | 2 | 36,000 | 72,000 |
| 3 | Semi Automatic Peeling Machine | 1 | 8,34,000 | 8,34,000 |
| 4 | Multi-colour Cashew Kernel Sorting machine | 1 | 7,29,300 | 7,29,000 |
| 5 | Husk Winnowing Machine | 1 | 1,05,000 | 1,05,000 |
| 6 | Steam Pipeline | 1 | 6,10,000 | 6,10,000 |
| 7 | Hot Oven | 1 | 3,35,000 | 3,35,000 |
| 8 | Hand operated Cutting Machine | 10 | 1,900 | 19,000 |
| 9 | Cashew Peeling Machine | 7 | 2,14,286 | 15,00,000 |
| 10 | Filling Machine | 1 | 1,05,500 | 1,05,500 |
| 11 | Pieces Separator | 1 | 90,000 | 90,000 |
| 12 | Weighing Machine | 3 | 13,500 | 40,500 |
| 13 | Sealing Machine | 1 | 3,500 | 3,500 |
| 14 | Food Grade Plastic Tubs, Buckets, Crates, Bowls etc | L.S | | 2,50,000 |
| 15 | Diesel Generator Set | 1 | 5,62,609 | 5,62,609 |
| | **Grand Total** | | | **60,14,409** |

**Other Assets**

- ✶ Furniture & fixtures,
- ✶ Cashew basket,
- ✶ SS utensils,
- ✶ Storage racks,
- ✶ Working tables
- ✶ Government Approvals

**Prior to establishment**

- ✶ Registration of concern with Registrar of Companies (ROC)
- ✶ NOC from Local Bodies like Gram Sabha/ MC etc. – mandatory
- ✶ Consent to establish from State Pollution Control Board – mandatory
- ✶ Approval of Layout plan for construction – mandatory
- ✶ Permission to dig bore well from Ground Water Survey and Development Authority (GSDA)
- ✶ Registration with District Industry Centre (DIC) for as Small and Medium Enterprise
- ✶ Application to State Electricity Board/ Authority for sanction of requisite power load

**After establishment**

- ✶ License from FSSAI
- ✶ Permission to commence production from State Pollution Control Board
- ✶ License from boiler inspector

**Manpower Requirement**

- ✶ The cashew processing industry is highly labor intensive. The labor is essential for each and every operation like loading and unloading of raw materials and finished products. Requirements of labor in the drying of raw materials, processing and packing of cashew kernel. The cashew cutting and peeling requires skill. Most of these cashew processing activities are performed by female skilled labor on a contract basis.

(पान ५ कॉलम ४ वर)

**कथाकली**

# समजूतदार

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

''एऽऽ शर्मन, अरे आहेस कुठे? दिसला नाहीस एवढ्या दिवसांत?'' नवीननं शर्मनला हाक मारीत विचारलं.

''अरे रजेवर होतो. नोकरी सोडणार आहे मी ही. दुसरीकडे खूप चांगल्या पगाराची नोकरी मिळतेय. रजेमध्ये तीन चार ठिकाणी इंटरव्यू दिलेयत.''

''बरं, आता चहा घ्यायला चल' असं म्हणत नवीन चहाच्या मशीनच्या दिशेनं गेला. दोघांनीही कपात चहा काढून घेतला आणि घुटके घेत ते गप्पा मारू लागले. तेवढ्यात त्यांना चिराग घाईघाईनं लिफ्टकडे पळताना दिसला. ते बघताच नवीननं त्याला हाक मारून विचारलं - ''ए चिराग कुठे पळतोयस?''

चिरागनं वळून त्यांच्याकडे बघत धावता धावताच सांगितलं - ''चला लवकर. लिफ्टमध्ये सांगतो.''

तसे दोघेही चिरागच्या मागे धावले. लिफ्ट सुरू होताच चिरागनं सांगितलं, ''शर्मन, अरे तुझ्या सेक्शनमधला संपन्न बेशुद्ध पडलाय.''

''आं? कशानं?'' नवीननं आश्चर्यानं विचारलं.

''मला असं कळलंय की तो ड्रग्ज घेतो.''

ते बोलत असतानाच लिफ्ट थांबली आणि ते तिघंही धावतच संपन्नच्या सेक्शनमध्ये शिरले.

संपन्न खाली जमिनीवर बेशुद्ध पडला होता. कुणी त्याचे हातपाय चोळीत होते तर; कुणी त्याच्या तोंडावर पाणी मारीत होते. कुणी कँटीनमधून फोडून आणलेला कांदा त्याच्या नाकाशी धरत होते.

ते बघताच चिराग म्हणाला - ''हा ह्या उपायांनी शुद्धीवर येणार नाही. मी कुठंतरी वाचलंय की ड्रग्ज घेणारा जर बेशुद्ध झाला तर त्याला हॉस्पिटलमध्येच न्यावं लागतं'' चिराग म्हणाला नी संपन्नच्या टीम लीडरला हाक मारून म्हणाला - ''अक्षत, संपन्नच्या घरी फोन लाव.''

अक्षतनं ताबडतोब त्याच्या घरी फोन केला - पलीकडून एका बाईचा आवाज आला - अक्षतनं विचारलं - ''तुम्ही संपन्नच्या आई का?''

''हो. कोण बोलतंय?''

''मी त्याच्या ऑफीसमधून त्याचा टीम लीडर अक्षत बोलतोय. संपन्न बेशुद्ध झालाय. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागेल. व्यवस्था करतो.''

''छे! मला नाही जमायचं तिकडे यायला. माझं आज 'वुमन्स क्लब'मध्ये भाषण आहे - 'पालकांची कर्तव्यं'. ह्या विषयावर. मी आत्ता तिकडेच निघतेय. मी माझा सेल नं. देते. तुम्ही मला हॉस्पिटलचं नाव कळवा. संपन्नच्या बाबांना मी सांगेन. ते त्या हॉस्पिटलला फोन करून त्याची उत्तम व्यवस्था करायला सांगतील....'' असं म्हणून संपन्नच्या आईनं फोन ठेवलासुद्धा.

अक्षतनं हे सांगताच प्रत्येकाच्याच चेहऱ्यावर मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं.

''तिकडे त्याची आई पोहोचेपर्यंत संपन्नबरोबर कुणी तरी राहायला हवं. मी असेनच... तुमच्यापैकी कोण...'' अक्षतनं सूतोवाच करताच प्रत्येकानं तिकडून काढता पाय घेतला. शेवटी चिराग, अक्षत, शर्मन आणि नवीन हे चौघंच उरले.

''मी मॅनेजरना सांगतो. तुम्ही सगळेच चला...''

भराभर चक्रं फिरली-

ॲम्ब्युलन्स जवळच्याच अश्विनीकुमार हॉस्पिटलकडे निघाली. लगेच अक्षतनं संपन्नच्या आईला हॉस्पिटलनं नाव कळवलं.

हॉस्पिटलमध्ये पोहोचताच हेड नर्स धावत आली आणि तिनं विचारलं - तुम्ही 'युनिव्हर्स' मधला हा 'संपन्न' आणलायना?

सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं, ''तुम्हाला कसं कळलं?''

''त्याचे वडील खूप मोठे उद्योजक आहेत नं, त्यांनी फोन करून सर्व सुखसुविधांनी युक्त अशी स्पेशल रूम बुक केलीय''- हेडनर्स उत्तरली.

संपन्नला त्या रूममध्ये हलवताच डॉक्टरांचं एक पथकच खोलीत शिरलं आणि ताबडतोब उपचार सुरू झाले. थोड्याच वेळात संपन्न शुद्धीवर आला. त्याचे डोळे सर्वांवर फिरले. तो म्लानपणे हसला. त्याची नजर कुणाला तरी शोधत होती - त्यानं विचारलं, ''माझे आईबाबा कुठेयत? त्यांना बोलवा.''

त्याबरोबर सगळे एकमेकांकडे बघू लागले. तशाही अवस्थेत संपन्न ते हेरून म्हणाला-'' मला माहीत आहे, ते आलेच नसणार.

''अं... येतील ते लवकर'' - नवीननं पुढं होऊन सांगितलं.

''बोलू नकोस. स्वस्थ झोप बघू.''

''मला बोलू दे. कदाचित् त्यामुळं मला बरं वाटेल'' संपन्न म्हणाला. डॉक्टरांनी त्याची बाजू उचलून धरली. हा आत्महत्येचा प्रयत्न किंवा अपघात असू शकत होता. पोलिसांना बोलावलंच होतं. त्यांनाही जबानी नोंदवून घ्यायची होती.

संपन्न सांगू लागला - ''आमच्या घरी हेच चित्र असतं. बाबांना वेळ नसतो - फक्त पैसे खर्च करता येतात - नी आईला समाजसेवेपुढे फुरसदच नसते. म्हणून मला फार एकटं वाटायचं. लहानपणापासून ह्याच श्रीमंतीचा मी तोरा दाखवायचो. आता आतापर्यंत ऑफिसातसुद्धा हेच तोऱ्याचं नाटक मी चालू ठेवलं होतं. त्या फसव्या श्रीमंतीच्या नशेत कायमच राहायचो - मनाच्या शांततेसाठी ही ड्रग्ज घ्यायला सुरुवात केली. तुमच्यात मिसळण्याऐवजी मी तुम्हाला विशेषतः आर्चितला तोरा दाखवायचो. त्याच्या परिस्थितीची निंदा करायचो...''

श्रीमंत परिस्थितीमुळे संपन्न येता जाता सगळ्यांचा अपमान करायचा. आणि आज त्याच श्रीमंत परिस्थितीत श्रीमंत आईवडिलांमुळे तो एकटा पडलाय... नवीनच्या मनात विचार उमटले.

नवीन हळूच शर्मनला म्हणाला, ''ही श्रीमंती काय कामाची? त्याला इथं आणायला, इथं त्याच्याजवळ थांबायला माणसंच जरूरीची ठरली नं?''

''खरंय! त्यालासुद्धा हे कळलंय. त्याची पैशाची घमेंड साफ उतरलीय बघ - माणसं आणि तीसुद्धा मनाच्या जवळची, अंतःकरणापासून काहीच क्षणांच्या अंतरावर असणारी माणसंच आवश्यक असतात'' -शर्मन 'माणसं' ह्या शब्दावर जोर देत कुजबुजला.

संपन्नं त्यांचं संभाषण ऐकलंच. आणि तो म्हणाला - ''खरंच! पैसा सगळ्याच गोष्टी नाही करू शकत हे आज लक्षात आलंय माझ्या. नवीन, मी तुम्हा सर्वांची माफी मागतो. मी तुम्हाला माझ्या उद्दाम वागण्यानं खूप त्रास दिला. अर्चितचीसुद्धा माझ्यातर्फे माफी मागा...''

''शर्मन, संपन्नचा अर्चित होणं टाळावं लागेल. त्यासाठी आपण त्याला माफ करायला हवं'' नवीन उद्गारला.

''खरंय!'' असं म्हणून सगळेच संपन्नच्या कॉटजवळ गेले आणि म्हणाले - ''संपन्न, झालं गेलं विसरून जा. शांत रहा. आम्ही तुला कधीच माफ केलंय..''

''आतां मला खूप बरं वाटतंय. पूर्वी खूप एकटं आणि म्हणून असुरक्षित वाटायचं. तुम्ही सगळे शाळेत घरच्या माणसांबद्दल बोलायचात, कारण तुमच्या घरी माणसं, तुमच्या हक्काचे आईबाबा असायचे. तुमच्याजवळ असायचे. पण आधी ते रागावले, ओरडले तर तुम्हाला नकोसे वाटायचे. नेमक्या त्याच गोष्टीचा फायदा घेऊन मी पैशांची घमेंड दाखवायचो. माझे आईबाबा मला माझ्याजवळ कधीच सापडले नाहीत.''

''संपन्न, तुझ्याजवळ नी अर्चित जवळ तुमचे आईबाबा असून नसल्यासारखे होतायत. तुमच्या मनाजवळ आहे ते त्यांचं तुमच्या बाबतीतलं दुर्लक्ष भले वेगवेगळ्या कारणांनी झालेलं. पण आईबाबांना सतत आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करू नका रे तुम्ही. त्यांना समजून घ्या. त्यांच्याजवळ वेळ किंवा पैसा नसेल त्याबद्दल त्यांना दोष देऊ नका'' - नवीन म्हणाला.

''पण त्यांच्या आईवडिलांनीसुद्धा त्यांना समजून घ्यायला हवं''- इतका वेळ त्यांचं बोलणं ऐकत असलेले डॉक्टर म्हणाले - त्यांना ते सांगायचं काम मी करीन. प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्य म्हणून किंवा पैसा कमवायचा म्हणून बराच वेळ घराबाहेर असतो. त्यातूनच दोन पिढ्यांमधला दुरावा निर्माण होतो नी वाढत जातो. संपन्न, तुझे वडील मोठे उद्योगपती आहेत. त्यांना समाजात स्वतःच स्थान आहे. ते एक पब्लिक फिगर आहेत. म्हणून त्यांची पत्नी ह्या नात्यानं तुझ्या आईलासुद्धा समाजात अव्वल दर्जा प्राप्त झालाय. म्हणून तिला सतत कुठे ना कुठे उद्घाटनाला, परिसंवादाला, व्याख्यानाला जाऊन समाजाच्या तिच्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण कराव्याच लागतात. गरज आहे ती एकमेकांना समजून घेण्याची आणि तुम्ही मुलांनीसुद्धा त्यांच्या मर्यादा समजून घ्यायला हव्यात. बघा - परस्परांना समजून घेण्याच्या उदार मनोवृत्तीनं तुम्हाला तुमची परस्परां-बाबतची मत चुकीची आहेत हे पूर्णपणे पटेल...मघाशी तुझ्या वडिलांबरोबर बोलणं झालंय माझं. त्यांना पटलंय माझं सांगणं... आईलाही पटेल..''

संपन्नलाही खरंच आईवडिलांच्या 'आधारा'ची सततची गरज चुकीची वाटू लागली...

आणि तो अगदी लहानपणीच्या निरागस संपन्न बनण्याच्या वाटेकडे आपसूकच वळला...

## Congratulation



DR. Paresh Vijaysen Navalkar...received Certificate and Marksheet at the hands of Dr. Chandiwale Dean of B J Government Medical College, Pune for successfully passing with distinction, 'Modern Pharmacology Course' Of Maharashtra University Of Health Sciences.

संवाद

छंदवेड्यांसाठी

# नाणीसंग्रहाची सुरुवात
## (मार्गदर्शन)

-विश्वास अजिंक्य

बऱ्याचदा नाणी जमविण्याचे शालेय जीवनातील वेड हे कॉलेजला जाण्याच्या आतच विरते. पण या छंदाला पद्धताशीर अभ्यासाची जोड दिल्यास तो आयुष्यभरासाठी आनंदाचा स्रोत बनतो. इतिहासाचा अभ्यास करताना महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या साधनांमध्ये त्या - त्या काळातील नाण्यांचा समावेश होतो. विशिष्ट आकाराच्या, वजनाच्या, धातूच्या तुकड्यांवर त्यातील वजन, शुद्धता, मूल्य यांची हमी देणारी चिन्हे, मजकूर यांनी अंकीत केलेला व शासकीय सत्तेद्वारा विनिमयाचे माध्यम ठरवलेल्या धातूच्या तुकड्यांना 'नाणी' म्हणतात. आर्थिक विनिमय, व्यापार उदीम, सुबत्ता, उन्नती, तंत्रज्ञानात्मक प्रगती, राजकीय यंत्रणा, धार्मिक कल्पना, कलाकुसर इत्यादी कितीतरी पैलूविषयी ऐतिहासिक नाणी बोलू शकतात. सुटी-सुटी नाणी तर बोलतातच, पण त्यांची जी शृंखला आणि संरचना असते ती तर खूप काही बोलते. नाण्यांमुळे राजांची नावे, त्यांची क्रमवारी, त्यांचा काळ, राज्यांची स्थाने, त्यांच्या सीमा समजण्यास मदत होते. नाणी जमवताना नाण्याचे वजन, आकार, प्रकार, धातू, नाण्यावरील मजकूर, चित्रे, चिन्हे, नाण्याचे दर्शनी मूल्य, त्याची टाकसाळ, त्याचा खरे - खोटेपणा या साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

नाणी संग्रहाची सुरुवात करतानाच एखादा विशिष्ट विषय घेऊन नाणी गोळा केली तर संग्रहाला नेटकेपणाबरोबरच अभ्यासाचीही जोड देता येते. त्यासाठी जगातील विविध देशांची नाणी, प्राचीन काळातील नाणी, मध्ययुगीन नाणी, मोगल सम्राटांची नाणी, मराठा संस्थानिकांची नाणी, इंग्रजांच्या भारतातील राजवटीतील नाणी, स्वातंत्र्य - पूर्व काळातील विविध संस्थानांची नाणी, स्वतंत्र भारताची नाणी, स्मारक नाणी असे अनेक पर्याय आहेत.

भारतीय नाणी पहाताना तर असंख्य सत्ता व त्यांचा काळ यांचा भला मोठा इतिहास पुढे उभा रहातो. स्वातंत्र्यापर्यंत संपूर्ण भारतात एकछत्री अंमल कधीही नव्हता. सम्राट अशोक, महंमद तुघलक, मोगल, यांना दक्षिण टोक जिंकता आले नव्हते. अकबरापासून ते शेवटचा मोगल बादशहा बहादूरशहा जफरपर्यंत घोषित - स्वयंघोषित असे २५ मोगल बादशहा होऊन गेले. त्यातील प्रत्येकाने कमी-जास्त प्रमाणात नाणी काढली होती. भारतीय इतिहासातील अतिशय महत्त्वाच्या परिवर्तनांपैकी एक म्हणजे इंग्रजांचे आगमन आणि भारताचा मध्ययुगीन अवस्थेतून आधुनिक काळात प्रवेश. पण इंग्रजांची भारतातील केवळ १/३ सत्ता ते थेट राबवत होते. तर २/३ सत्ता वेगवेगळ्या राजवटी इंग्रज छत्राखाली राबवत होत्या. भारताला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा भारतात ६०० च्या वर लहान मोठी संस्थाने होती. त्यातील १२५ जणांची स्वत:ची नाणी होती, त्यामुळेच भारतीय नाण्यांत विविधता आहे. इंग्रजांनी जेव्हा मराठी राज्य जिंकले तेव्हा भारतात ९९४ प्रकारची सोने व चांदीची नाणी चलनात होती. भारतीय नाण्यांचा जन्म इ. स. पूर्व ६ व्या शतकात मानला गेला आहे पंच मार्कड् कॉईन्स ही भारतातील सर्वात जुनी नाणी. २६०० वर्षांची अखंडीत परंपरा भारतीय नाण्यांना लाभली आहे. तर आशिया मायनर येथील 'लिडीया' या ठिकाणी इ. स. पूर्व ७ व्या शतकात व्यापाऱ्यांची चिन्हे उमटवलेली नाणी सर्वप्रथम पाडली गेली.

जगातील विविध देशांची संख्या २०० च्या आसपास आहे. ही संख्या सतत बदलत असते. भारताच्या फाळणीतून पाकिस्तानचा जन्म झाला. पण पाकिस्तानच्या नशिबीसुद्धा फाळणी लिहिलेली होती. त्यामुळे १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तान स्वतंत्र झाला आणि बांगलादेश या नावाने ओळखला जाऊ लागला. एका बाजूला जर्मनी एकसंघ झाला. तर रशिया, युगोस्लाव्हिया, झेकोस्लाव्हियाचे भाग पडून नवीन राष्ट्रे उदयास आली.

नाणी जमवण्यास सुरुवात करताना स्वत:च्या घरापासूनच सुरुवात करावी. रोजच्या व्यवहारातले परंतु वेगळे दिसणारे एक नाणे जरी आपण बाजूला काढून ठेवले तरी काही दिवसातच आपल्या जवळ विविध प्रकारची नाणी जमलेली दिसतील. नंतर त्या आधीची नाणी मिळवायचा प्रयत्न करावा. आपले परिचित, नातेवाईक, मित्रमंडळी यांना सांगून त्यांच्याकडून नाणी मिळवावीत. जगातील विविध देशांची नाणी-नोटा मिळविण्यासाठी नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने हिंडणारे-हिंडलेले, तसेच परदेशातील नातेवाईक, मित्रमंडळींना सांगून त्यांच्याकडून विविध देशांची नाणी व नोटा मिळवाव्यात. आपल्याजवळ एकाच प्रकारची दोन नाणी असल्यास नाणी जमविणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर शक्य असल्यास त्यातील एक नाणे बदलून घ्यावे. मात्र ज्यांना आपला नाण्यांचा संग्रह वाढवायचा आहे; अशांना आपल्याला हवी असलेली नाणी विकत घेण्याशिवाय पर्याय नाही. कारण आपल्याला हवी असलेली नाणी कधी काळी आपल्याला मिळतील या आशेवर नाणी संग्रहाची वाढ होणार नाही. त्यासाठी जुना बाजार, सराफा बाजार - झवेरी बाजारातील; विशेषत: चांदीचा व्यवहार करणारे झवेरी, फाटक्या जुन्या नोटा बदलून देणारे मारवाडी, कॉईन शॉप तसेच नाण्यांच्या प्रदर्शनास भेटी द्याव्यात. संग्राहक आणि विक्रेत्यांच्या गाठी-भेटी घ्याव्यात. नाणी विकत घेताना एखाद्या ज्येष्ठ नाणी संग्राहकाचा सल्ला घेऊन नाण्यांची स्थिती, त्यांचे सध्याचे बाजारमूल्य, उपलब्धता, दुर्मिळता, त्यांचा खरे-खोटेपणा इत्यादी बाबी लक्षात घेऊन विकत घ्यावीत. नाणी विकत घेताना उत्तम स्थितीतील नाणीच विकत घ्यावीत. झिजलेली, ज्याच्यावरचा मजकूर वाचता येत नाही अशी नाणी विकत घेऊ नयेत. चोरबाजार तसेच रस्त्यावर खोटी नाणी विकणाऱ्यांपासून सावध रहावे. ही मंडळी खऱ्या नाण्यांमध्ये खोटी नाणी बेमालूमपणे मिसळून विकत असतात. नाणी जमविण्याचा छंद हा तसा थोडाफार खर्चिक आहे. मात्र आपण खर्च केलेल्या पैशाच्या मोबदल्यात पैसाच आपल्याजवळ येत असतो. नाण्यांमध्ये विविधताही खूप असल्यामुळे या छंदाला शेवट असा नाही.

वेगवेगळ्या नाण्यांची ओळख करून घेताना धातू, चलन, लिपी, अक्षरे, छाप, नक्षी, रुप, आकार यांचा गुंता सोडविण्यासाठी विविध पुस्तके व कॅटलॉग यांचा आधार घेणे आवश्यक ठरते. कॅटलॉगमुळे नाणी जास्त बोलकी होतात व आपल्याकडे कुठची नाणी आहेत, कुठली नाहीत हे सहज लक्षात येते. तसेच आपल्या संग्रहातील नाण्यांचे कोष्टक, त्यांचे वजन, आकार, त्यांची त्यावेळची चलनातली किंमत यांचा अभ्यास करता येतो. ''साऊथ एशियन कॉईन्स अँन्ड पेपर मनी'' या ६०० पानी ग्रंथवजा कॅटलॉगमध्ये सम्राट अकबराच्या १५५६ सालच्या नाण्यांपासून ते स्वतंत्र भारतातील १९८१ पर्यंतच्या सर्व नाण्यांची माहिती संग्रहीत केली आहे. तर डॉ. जेम्स मँके यांच्या 'कॉईन्स अँड कॉईन कलेक्टींग'' या कॅटलॉगमध्ये जगातील विविध देशांच्या ३००० नाण्यांची रंगीत फोटोसहित माहिती संकलित केली आहे.

नाणी ठेवण्यासाठी पारदर्शक प्लास्टिक असणारे अल्बमही उपलब्ध असतात. ज्यामध्ये नाणे व्यवस्थितरित्या रहाते व दोन्ही बाजूंनी नाणे योग्यरित्या दिसू शकते. त्याचबरोबर नाणे धूळ व हवेपासून सुरक्षित रहाते. तांब्याची नाणी उघडी ठेवल्याने काही काळाने हिरवट होतात. अशी ऑक्सिडाइझ झालेली नाणी चिंच किंवा भांडी साफ करायच्या पावडरने घासू नयेत. त्यामुळे नाण्याचे मूळ स्वरूप बिघडते. तांब्याची नाणी साफ करण्यासाठी ऑलिव्ह ऑईलमध्ये बुडवून ठेवावीत व काही दिवसांनी बोटांनी चोळून हिरवी पुटे काढावीत. तर चांदीची नाणी, कॉपर - निकेलची नाणी रिठ्याच्या उकळलेल्या पाण्यात बऱ्यापैकी स्वच्छ होतात. चांदीची नाणी रिठ्याच्या पाण्यात उकळून झाल्यावर, कापडाच्या तुकड्यावर फ्लोराईड टुथपेस्ट घेऊन नाण्यांना हलक्या हाताने चोळून स्वच्छ करावीत.

जुन्या नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी नाशिक - त्र्यंबकेश्वर रस्त्यावर अंजनेरी येथे ''इंडियन इन्स्टिटयूट ऑफ न्यूमिस्मॅटिक स्टडीज'' ही संस्था आहे. या संस्थेत विविध काळातील राज्यांच्या ३००० नाण्यांचे संग्रहालय, सुसज्ज ग्रंथालय, नाणी - लिपी परिचय वर्ग, विश्राम गृह अशा सोयी आहेत. मुंबई विद्यापीठाने कालिना संकुलात असलेल्या दिनेश मोदी नाणे संग्रहालय आणि नाणेशास्त्र संस्थेत नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी 'नाणेशास्त्र' विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला आहे.

*

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार. दि. २० मे, २०१८ रोजी खारच्या सांस्कृतिक केंद्रात उद्योजक बंधु-भगिनींसाठी पूर्वनियोजित एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

सर्व उपस्थितांना प्रथम नाश्ता म्हणून उपमा-वड्यासोबत नीता सेंजीत यांच्यातर्फे जिलेबी तसेच चहा-कॉफी देण्यात आली. त्यानंतर ठीक १०.३० वाजता दीप प्रज्वलनाने व क्षमा कोठारे यांच्या गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गायिका क्षमा कोठारे यांचा सन्मान विश्वस्त श्रीमती स्वाती जयकर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन केला गेला. त्यानंतर समाजाध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. कार्यक्रमातील पहिले वक्ते श्री. मिलिंद मुकुंद कोठारे यांचा परिचय सौ. रश्मा नवलकर यांनी करून दिला. श्री. कोठारे यांनी उद्योजक होऊ पाहणाऱ्यांसाठी उचित असे मार्गदर्शन केले. त्याबरोबरच प्रेक्षकांच्या शंकांचे निरसनही केले.

त्यानंतर सौ. बिबा नायक यांनी विविध प्रकारची सरबते कशी बनवावीत याचे प्रात्यक्षिक केले. उपस्थितांना ऑरेंज सरबत चवीसाठी दिले. यानंतर बिबा यांची कन्या सौ. रीना धैर्यवान यांनी विविधता दर्शविणारे सुगंधी साबण बनविण्याचे प्रात्यक्षिक केले. साबणासाठी लागणारे प्लास्टिक मोल्ड (साचे) व इतर साहित्य कोठे मिळू शकतात याचे उत्तम मार्गदर्शन केले. या दोघींचा परिचय चिटणीस

(पान ५ कॉलम १ वर)

(पान ४ कॉलम ४ वरून)
सौ. पल्लवी कोठारे यांनी करून दिला. यानंतर मध्यंतरासाठी अर्ध्या तासाची विश्रांती घेण्यात आली. सर्वांनी व्हेज-नॉनव्हेज बिर्याणी - काळा गुलाबजांबचा आस्वाद घेतला.

दुसऱ्या सत्रात पर्यटन क्षेत्रात काम करणारे पाठारे प्रभुंचे जावई श्री. मोहन शेजवळ यांचे उत्तम मार्गदर्शन झाले. उपस्थितांच्या शंकांचे त्यांनी निरसन केले आणि त्यांना प्रवासात आलेल्या चांगल्या-वाईट अनुभवांचे कथन केले. श्री. शेजवळ यांचा परिचय समाजाच्या उपाधयक्षा सौ. साया नवलकर यांनी करून दिला. त्यानंतर सौ. सीमा महाजन यांनी अॅक्रेलिक व क्रिस्टलची सुंदर फुले बनविण्यास शिकवली. त्यासाठी लागणारे साहित्य कोठे मिळू शकते; याचे मार्गदर्शन केले. त्यानंतर 'बँक ऑफ इंडियाचे'चे श्री. अनंत दिघे, श्री. सेथी व श्री. विवेककुमार यांनी उद्योगासाठी लागणारे कर्ज- तसेच गोल्ड कसे घेता येईल यासंदर्भात मार्गदर्शन केले. सौ.. सीया व श्री. दिघे यांचा परिचय समाजाच्या सल्लागार सौ. उर्वशी धराधर यांनी करून दिला. सर्वात शेवटी शेफ प्रिया दीक्षित यांनी क्रीम चीज सँडवीच, मँगो चीजकेक व फ्लॉवर बास्केट केक यांचे प्रात्यक्षिक दाखविले. शिवाय या प्रत्येक कृतीचा आस्वादही सर्वांना देण्यात आला. शेफ प्रिया यांचा परिचय सौ. बिंबा नायक यांनी करून दिला.

या सर्व मार्गदर्शकांचे स्वागत समाजाध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी भेटवस्तू देऊन केले.

नाश्ता-भोजन व दोन वेळची चहा-कॉफी यांची चोख व्यवस्था श्री. सुधीर धुरंधरानी केली होती.

अशा रीतीने ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली.

याप्रसंगी श्री. मिलिंद कोठारे यांनी त्यांचे वडील श्री. मुकुंद आणि उद्योगपती आजोबा रावबहादूर गजानन कोठारे यांच्या स्मरणार्थ रु. ५०००/-ची देणगी दिली.

---

महिला समाजातर्फे रविवार दि. ३ जून २०१८ रोजी दुपारी ४.३० वाजता पा. प्र. को-ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात प्रभु नगर, १२वा रस्ता, खार(प.) येथे अधिक ज्येष्ठ महिन्याप्रीत्यर्थ हळदीकुंकू समारंभ साजरा झाला. उपस्थितांना गजरे, मेसूर, मुगाची भाजी व शीतपेय देण्यात आले. त्याच दिवशी नृत्य व संगीत स्पर्धा घेण्यात आली. समारंभाला ज्ञातीतील स्त्रीपुरुष बहुसंख्येने हजर राहून स्पर्धकांना रसिकतेने दाद देत होते.

स्पर्धेत पुढील भगिनींना पारितोषिके मिळाली.

१) संगीत स्पर्धा:-

(अ) महिलांसाठी.

विषय- मराठी सिनेसंगीत

प्रथम क्रमांक- सौ. रजनी नितीन कोठारे

द्वितीय क्रमांक- श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे

तृतीय क्रमांक- सौ. सुहास नंदकुमार विजयकर

(ब) १५ वर्षांखालील मुलींसाठी

विषय- हिंदी सिनेसंगीत

प्रथम क्रमांक- कु. आदिती आशीष व्यवहारकर

द्वितीय क्रमांक-कु. अनिका निहाल कोठारे

तृतीय क्रमांक-कु. प्रणाली राकेश राणे

परीक्षक:- श्री. घनश्याम दीक्षित

श्री. प्रदीप राणे यांनी तबल्यावर व श्री. प्रभुदेसाई यांनी संवादिनीवर गायिकांना साथ दिली.

२) नृत्यस्पर्धा

विषय- पद्मश्री सिनेअभिनेत्री श्रीदेवीने हिंदी चित्रपटात केलेला नृत्याविष्कार.

(अ) ५ ते ९ वर्ष- मुले व मुली

एकच उमेदवार असल्यामुळे कु. अदिती आशीष व्यवहारकर हिला समाज प्राईज.

(ब) १६ ते २५ वर्षे

महिला एकच उमेदवार असल्यामुळे कु. वैदेही सागर अजिंक्य यांना समाज प्राईज.

(क) ४० वर्षांवरील महिला

प्रथम क्रमांक- सौ. संगीता गिरीश दळवी

द्वितीय क्रमांक- सौ. गीता धराधर आंबवणे

तृतीय क्रमांक- श्रीमती सुरुपा राणे देवरूखकर

परीक्षक:- कु. वैदेही उदय मुळ्ये

कु. आश्ना मिलिंद जयकर पुरुस्कृत उत्कृष्ट नृत्याविष्कार ट्रॉफी- सौ. गीता धराधर आंबवणे. उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक - कु. वैदेही सागर अजिंक्य. परीक्षकांचा परिचय चिटणीस सौ. पल्लवी कोठारे यांनी केल्यावर समाजाध्यक्ष सौ. नीता सेंजित यांनी परीक्षकांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला. सर्वांनी विनंती केल्यावर उपस्थितात हजर असलेले प्रभुआयडल श्री. राजन प्रधान यांनी सुस्वरात गाणे म्हणून प्रेक्षकांची दाद घेतली. कु. वैदेही मुळ्ये यांनीही आपल्या नृत्याची झलक दाखविली. स्पर्धेत भाग घेण्यासाठी पुणे व तळेगावहून भगिनी आल्या होत्या.

---

## पत्र प्रतिक्रिया

प्रिय सुहासिनीस,

'प्रभु तरुण'चे 'पदपुराण' हे संपादकीय केवळ अप्रतिम. मी ते वाचले आणि खूप आनंद झाला. त्या लेखात पायावर असलेल्या अनेक गोष्टी गमतीगमतीने आल्या आहेत. माहिती, विनोद, आत्मरूप, शैलीदार खाचाखोचा यामुळे मला आपलं वाटलं की, याचं शीर्षक 'पाय'सम् असं हवं होतं. पायसम्मध्ये काजू, खिसमिस, केशर, वेलची... असा सर्व स्वाद वाढवणारा मसाला असतो. तसेच तुझ्या लेखात गंमत वाढविणारा सर्व मसाला आहे. खूप आवडला लेख.

जूनच्या प्रदीपबद्दलच्या 'प्रभुतरुण' बद्दल काय सांगू? मी त्यातला शब्द न् शब्द वाचला. अंक हृदयस्पर्शी झाला आहे.

तुझी,
नलिनी तळपदे

---

## अभिनंदन

∗ सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे या 'मिती चार, कल्याण'तर्फे 'रात्रदिवस' या नाटकातून रंगभूमीवर वावरत आहेत.

∗ सामाजिक न्याय आणि व्यवस्था विभागाचे मंत्री श्री. राजेंद्र बडदे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथी सभागृहात ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार केला गेला. रमेश देव, निर्मला सामंत-प्रभावळकर आदींची उपस्थिती असलेल्या या समारंभात श्रीमती वंदना नवलकर यांचा 'नाना-नानी' शाळेच्या प्राचार्या म्हणून सत्कार झाला.

∗ श्री. रोहन राजन प्रधान यांनी काढलेली दोन तैलचित्रे अमेरिकेत मॅनहटन येथील '२०१८ जीएनए आर्ट शो' मध्ये 'सल्माकंड क्लब एनवायसी'साठी निवडली गेली आणि या दोन्ही तैलचित्रांना खास ज्युरीचे बक्षिस मिळाले. ज्याठिकाणी हा 'आर्ट शो' झाला त्याची स्थापना १९१७ मध्ये झाली आहे.

---

# एक कथा- भावांजलीची

**-विनय त्रिलोकेकर**

मी आजवर अनेक कथा व गोष्टी ऐकल्या असतील. अनेक गोष्टी सांगितल्या असतील. आणि अनेक कथा लिहिल्या असतील. साऱ्या काही संपूर्ण सत्य घटनांवर आधारित नसतील. अनेकदा त्यात मोठ्या प्रमाणात काल्पनिक भाग असत असे. पण ही गोष्ट एक संपूर्ण सत्यकथा आहे. मनाला हुरहूर लावणारी कथा.

तो दिवस होता सोमवार २८ मे, २०१८. होता तो एक काळा दिवस. त्या दिवशी आपल्यातून निघून गेला ७२ वर्षांचा तरुण. गेला एक दयाळू माणूस. गेली एक परोपकारी व्यक्ती. गेला एक अतिविनयशील माणूस. गेला एक आध्यात्मिक पुरुष. गेला एक उमदा व उदात्त प्रभुतरुण. गेला आमच्यातून एक हौशी कलाकार. गेला एक जाणकार व्यंगचित्रकार आणि त्यांच्या सोबत गेला आमचा मित्र प्रदीप शामराव कोठारे आणि मिटले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व- एक बहुआयामी व्यक्तिमत्व!

खरोखरच आमचा प्रदीप एक 'Multifaceted personality', अर्थात चतुरस्त्र! त्याची धडाडी, काम करण्याचा जोम आणि उत्साह एखाद्या किशोरवयीन मुलांनादेखील लाजवील. कोणतेही काम हाती घेतले की ते तडीस नेल्याशिवाय तो शांत बसत नसे. ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील अनेक संस्थांमध्ये केवळ सहभाग नव्हता तर एक मोठा व महत्त्वाचा वाटा होता. एव्हढेच नव्हे, काही काही संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यात सहभाग होता. कदाचित विरंगुळा म्हणून तो हौशी रंगभूमीवर वळला असेल पण अखिल भारतीय आंतरविमा नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट अभिनयाचे पदक त्यानी पटकावले होते.

प्रदीप एक जाणकार व्यंगचित्रकार होता. 'कार्टूनिस्ट कम्बाईन'च्या एका शिबिराच्या प्रदर्शनात प्रदीपची व्यंगचित्र प्रदर्शित झाली होती. त्याची व्यंगचित्र बोलकी असत आणि 'हसरी रेखा'द्वारे अनेक सामाजिक विषय त्यानी चांगल्या प्रकारे हाताळले. त्यातील मला बरीच आवडलेली पण ही चार नमूद करतो:

१) दोन विषय एकाच वेळी - स्त्रीभ्रूण हत्या आणि त्यापासून मिळालेले पालकांना नियतीचे फळ, आई- वडिलांची वृद्धाश्रमात रवानगी: मुलगा मिळवण्यासाठी गर्भपात करणे आणि मग तोच मुलगा देतो त्यांना एक प्रकारची शिक्षा- वृद्धाश्रम!

२) मोफत ग्रंथालय पडते ओसाड व आसाराम बापूंसारख्या भोंदू बाबांच्या आश्रमाकडे रीघ.

३) महान देशाची स्वच्छता मोहीम -एक बोलके चित्र - पान खाऊन थुंकीची पिचकारी मारणे .

४) अंधश्रद्धा - एक बोलके चित्र -

मी रेखाटलेली चित्रं पाहून प्रदीप मला अलीकडेच म्हणाला होता, ''विनय, दिवाळी अंकाकरिता काही कार्टून्स तू काढ. कोणते माध्यम वापरायचे, कोणती शाई, पेन्सिल कोणती , पेपर कोणता, हे मी तुला सांगेन. माझ्या घरी ये.''

आज येतो - उद्या येतो असे करीत तो योग आलाच नाही. मनात राहिली ती फक्त खंत!

आध्यात्मिकतेकडे त्याचा कल जरूर होता. पण तो धार्मिक होता असे मला वाटत नाही. तो कर्मयोगी होता असे मला वाटते. लोकांच्या मदतीस धावून जाणे हा जणू त्याचा धर्मच होता आणि ते देखील 'out of the way' जाऊन! त्यानी अनेकांना अनेक प्रकारे मदत केली आहे, मग तो आपल्या ऑफिसमधला कनिष्ठ कर्मचारी असो किंवा वरिष्ठ असो, ज्ञातीतले असोत अगर दुसऱ्या ज्ञातीतील, शेजारी असो किंवा नातलग, कोणताही भेदभाव न करता त्याच्या मदतीस धावून जाणे हेच एक उद्दिष्ट.

प्रदीप माझा चांगला मित्र होताच पण त्याचबरोबर तो माझ्यातील लेखकासाठी एक मार्गदर्शक- philosopher and guide ठरला. योगायोगाने माझे इंग्रजीतले काही लिखाण (ब्लॉग) त्याने वाचले. कथेतील लहान-मोठे किस्से व एकंदरीत गोष्ट सांगण्याची माझी लकब तसेच लिखाणाद्वारे वाचकांना व श्रोत्यांना कसे मंत्रमुग्ध करावे ही माझ्यातील सुप्त प्रतिभा (the latent talent in me of narrating anecdotes effectively and holding

(पान ६ कॉलम १ वर)

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

∗ The processing units also need to employ permanent labor for handling various day to day operations. The detail of manpower requirement is given in Table below.

| Sr | Post | Nos. | Salary/wages | Annual |
|---|---|---|---|---|
| 1 | Manager cum Supervisor | 1 | 25,000 | 3,00,000 |
| 2 | Skilled labour | 2 | 15,000 | 1,80,000 |
| 3 | Helper | 1 | 8,000 | 96,000 |
| | **Total** | **4** | | **5,76,000** |

**Total Production :**
125 Tons output of Finished Cashew Kernels per season
Rs .80,000/- per ton X 125 Tons = 1,00,00,000
Rs 20,000/- per Ton profit X 125Tons = **25,00,000/-** profit per season If we work for 4 seasons Then 25,00,000 X 4 = **1,00,00,000/-**

For Details contact : Sudesh Desai 9223357207
**Email : sudesh69desai@gmail.com**

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर


## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीम. कस्तुर रवींद्र तळपदे यांजकडून रु. १००१/-

✶ श्री. राजन गोविंदराव प्रधान यांजकडून त्यांना नातू झाल्याबद्दल रु. ५०१/-

✶ सौ. अर्चना अभ्युदय लेले (पूर्वाश्रमीच्या अर्चना प्रमोद नवलकर) यांजकडून त्यांची कन्या कु. आयुशा अभ्युदय लेले बारावी (कॉमर्स) परीक्षेत ८३ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याप्रीत्यर्थ रु. २५१/-

### चुकीची दुरुस्ती

जूनच्या अंकात श्री. अजित इंद्रसेन नवलकर यांनी त्यांचे वडील श्री. इंद्रसेन यशवंत नवलकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त दिलेली देणगी कृपया रु. ५०१/- अशी वाचावी.

देणगीदारांचे आभार

✳

(पान ५ कॉलम ४ वरून)

the audiences and the readers spell bound.) त्यानी अचूक ताडली. आणि त्यानी तसे मला सांगितले देखील.

''विनय, तू चांगले लिहितोस. खरोखर. तू आमच्या प्रभुतरुणसाठी तुझ्या गोष्टी मराठीतून लिहिशील का? नाही, तू लिहिणार!'' कोणाला अशा प्रकारे लाडीगोडी लावून (coaxing) प्रोत्साहन देणे हे प्रदीपलाच जमायचे.

मी प्रभुतरुणसाठी एक हौशी लेखक (amateur writer) म्हणून प्रवेश करून आज एक नियमित स्तंभलेखक (regular columnist) झालो. आणि 'त्याचे प्रभुतरुण' आता 'माझे'ही झाले.

✳

## परीक्षेतील सुयश

### एसएससी

कु. तनीशा उदय तळपदे ९२.५ %

### आयसीएससी (दहावी)

कु. अलिशा राहुल नवलकर ९२.८३ %

### बारावी (कॉमर्स)

कु. अमित निलेश राणे ८१.३८ %

कु. ऐश्वर्या समीर धुरंधर ७२ %

### बारावी (सायन्स)

कु. निशांत अतुल तळपदे ५१ %

### बी टेक (कॉम्प्युटर सायन्स)

कु. अदिती दिनार तळपदे, (डिस्टिंक्शन)

✳

## पाठारे प्रभु सोशल समाज

✶ पा. प्र. सोशल समाजातर्फे शनिवार दि. २८-०७-१८ रोजी दुपारी ४ वाजता पा. प्र. चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात अभंगयात्रा आयोजित करण्यात आली आहे. ज्या बंधु-भगिनींना यात सहभागी व्हायचे असेल त्यांनी कृपया चिटणीसांशी संपर्क साधावा.

✶ पा. प्र. सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १९-०८-१८ रोजी पा. प्र. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राचे सभागृह, गायत्री मंदिरा शेजारी, १२वा रस्ता, खार (प.), येथे दुपारी ४ वाजता समाजाध्यक्षा श्रीम. स्वाती राणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल. तसेच यावेळी कार्यकारी समितीच्या सभासदांसाठी पंचवार्षिक निवडणूक घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे त्वरित संपर्क साधावा. चिटणीसांची नावे पुढीलप्रमाणे:
नीता सेजित- ९८२०१६६६२८
श्री. जयंत कीर्तिकर- ९८६७९५८५३५

निवडणुकीच्या मतपत्रिका सदस्यांना सायंकाळी साडेसात वाजेपर्यंतच उपलब्ध असतील याची नोंद घ्यावी.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| ०४-०५-१८ | सौ. दिप्ती व श्री. श्रेयस अनिल तळपदे | कन्या | अंधेरी |
| २३-०५-१८ | सौ. पूजा व श्री. रोहन राजन प्रधान | पुत्र | न्यूजर्सी (.युएसए) |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १९-०५-१८ | कु. मंगला हरिनंदन धराधर | वय ६८, | खार |
| २५-०५-१८ | श्री. रजनीकांत केशवराव देसाई | वय ८४, | कांदिवली |
| १४-०६-१८ | श्रीम. कविता बाळाराम त्रिलोकेकर | वय ८४, | बोरिवली |
| ०३-०७-१८ | श्रीम. अर्पणा सुबोध व्यवहारकर | वय ८१, | मालाड |
| ०३-०७-१८ | श्रीम. सुजाता देवकुळे (पूर्वाश्रमीच्या शोभा कोठारे) | | |
| ०६-०७-१८ | श्रीम. कांचन कृष्णनाथ नायक | वय ८८, | अंधेरी |

**THE PATHARE PRABHU CHARITIES**

***Silver Jubilee Educational Merit Prize Award on Sunday, December 02, 2018***

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onwards from a recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photo copies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities, Thakurdwar, between 11.00 a.m. and 5.30 p.m. after the result of the examination is declared but not later than September 15, 2018 to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the trust only on the basis of the result/mark sheets received by the Trust before the dead line. Please note that we declare percentage of students passing 10th standard on the basis of overall marks obtained and not any best five subjects.

This year the Annual Educational Merit Prize Awards Function will be held on Sunday December 02, 2018 at M.V.M. Degree College of Commerce & Science Mogaveera Bhavan, MVM Educational Campus Marg, Off Veera Desai Road, Andheri West, Mumbai - 400058.

Students are requested to furnish the following requirements along with the examination result/mark sheet.

1. Full Name of the student (Married Female to give maiden name also)
2. Latest coloured photo of the student, postcard size with light background and name of the student written on the back side of the photo.
3. Full Postal Residential Address
4. Telephone No.
5. Email address if available
6. Confirmation regarding student having bank account : Yes/No.
7. Name of Grand father
8. Bio data in brief (past record of academic career)
9. Confiramtion whether the student will receive the prize if awarded, by his/her personal attendance at the function on the aforesaid date

Chief Guest : Mr. Vikas Bhagwan Mankar, MSC, MBA
Mrs. Veena Vikas Mankar, BA, MBA

for the Board of Trustees
The Pathare Prabhu Charities
Uday Mankar

## शोकसभा

दिनांक १० जून २०१८ रोजी श्री. राजन मोतीराम जयकर यांच्या पुढाकाराने प्रभु सेमिनरीच्या सभागृहात श्री. प्रदीप कोठारे यांना भावांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत विल्सन शाळेच्या माजी विद्यार्थीमंडळातर्फे श्री. राजन जयकर बोलले. 'प्रभुप्रभात'च्या संपादिका वंदना नवलकर आणि 'प्रभुतरुण'च्या संपादिका सुहासिनी कीर्तिकर, प्रदीपच्या सुकन्या साक्षी झावबा यांनी प्रदीप यांना आपल्या भाषणातून श्रद्धांजली वाहिली.

ब्रह्मकुमारी, ऑल इंडिया इन्शुरन्सतर्फेही काहींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67